पुढारी – दि. १४ फेब्रुवारी, २०२०

# २५ चौकांत 'थ्री डी' झेब्रा क्रॉसिंग

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील विविध चौकांत 'थ्री डी' झेब्रा क्रॉसिंग करण्याचा निर्णय महापालिकेच्या पथ विभागाने घेतला आहे. सुरुवातीला प्रायोगिक स्वरूपात शहरातील २५ चौकांत हे क्रॉसिंग करण्यात येणार आहे. यासंबंधीची शिफारस वाहतूक पोलिसांकडून महापालिकेस करण्यात आली. त्यानुसार निर्णय घेण्यात आल्याचे पथ विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

शहरातील वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी शहरातील लहान-मोठ्या रस्त्यांवर महापालिकेकडून पांढऱ्या आणि पिवळ्या पट्ट्या ओढल्या जातात. चौकांत सिग्नल लागल्यानंतर सिग्नलला थांबणाऱ्या वाहनांनी चौकापासून सुरक्षित अंतर ठेवण्यासाठी चौकातील रस्त्यांना झेब्रा क्रॉसिंगचे पांढरे पट्टे ओढले जातात. या झेब्रा क्रॉसिंगमुळे पादचाऱ्यांनाही सुरक्षित आणि विना अडथळा रस्ता ओलांडण्यास मदत होते. मात्र, अनेक वेळा हे पट्टे वाहतुकीमुळे पुसले जातात. त्यामुळे चौकातील वाहतुकीस व पादचाऱ्यांना वाहनांचा त्रास होतो.



संग्रहित छायाचित्र

या पार्श्वभूमीवर थ्री डी झेब्रा क्रॉसिंगची संकल्पना समोर आली. थ्री डी क्रॉसिंगमुळे वाहनचालक आपल्या वाहनांचा वेग कमी करतील, वाहनचालकांचे यामुळे लक्ष वेधले जाईल. या सर्व गोष्टींचा विचार करून महापालिकेकडून नोव्हेंबरपर्यंत चौकांमध्ये थ्री डी. झेब्रा क्रॉसिंग तयार करण्यात येणार आहेत. यासंदर्भात पालिका पथ विभागाने महापालिकेच्या अंदाजपत्रकात शहरातील विविध चौकांत थ्री डी झेब्रा क्रॉसिंग करण्यासंदर्भात तरतूद केली. यामध्ये लोकमान्य टिळक चौक, स्वारगेट येथील विविध चौक, पुणे स्टेशन, जुना बाजार चौक, वाडिया महाविद्यालय चौक, येरवडा चौक, शास्त्रीनगर चौक आदींचा समावेश आहे.


जगामध्ये पहिल्यांदा इंग्लडमध्ये थ्री डी झेब्रा क्रॉसिंग करण्यात आले. नागरिकांची सुरक्षितता आणि वाहनचालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे क्रॉसिंग महत्त्वाचे आहेत. वाहनचालकांना कोणत्याही बाजूने हे क्रॉसिंग सहजगत्या दिसतात. दिल्लीत अशा प्रकारचे क्रॉसिंग २०१६ मध्ये तयार करण्यात आलेले आहेत.

> “ प्रशासनाने शहरात थ्री डी क्रॉसिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्य चौकात जास्त वेगात वाहने चालविली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळेच वाहतूक पोलिसांकडून यासंदर्भातील माहिती गोळा करण्यात येत आहे. वाहतूक पोलिसांशी चर्चा करून चौक अंतिम करण्यात येत आहेत.
>
> **-व्ही. जी. कुलकर्णी,**
> पथ विभागप्रमुख,
> महापालिका.

# वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने महामॅरेथॉन यशस्वी

पुणे : लोकमत आयोजित महामॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजनात शहर वाहतूक शाखेचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. महामॅरेथॉनचा मार्ग हा तसा सकाळपासूनच वाहतुकीचा असतो. मुंबईकडे जाणारी व तेथून येणाऱ्या वाहनांची बाणेर रस्त्यावर मोठी वर्दळ असते. महामॅरेथॉनच्या आयोजनात वाहतूक पोलिसांचा सुरुवातीपासून सहभाग होता. शनिवारी रात्री उशिरा मॅरेथॉनच्या मार्गावर बॅरिकेड्स टाकण्यासाठी त्यांची मोठी मदत झाली. संपूर्ण २१ किमीच्या मार्गावर धावपटू सुरक्षितपणे धावू शकतील, त्यांना वाहनांचा अडथळा येणार नाही, अशा पद्धतीने सर्व बंदोबस्त लावण्यात आला होता. बालेवाडी स्टेडियमपासून राधा चौकापर्यंत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहतूक शाखेने संपूर्ण वाहतुकीचे नियोजन केले होते. त्यानंतर राधा चौकापासून संपूर्ण बाणेर रोड ते पुणे विद्यापीठ चौक व तेथून औंध रोडने ब्रेमेन चौक, परिहार चौक व परत असा या मार्गावर संपूर्ण पोलीस बंदोबस्ताची पहाटे ४ वाजल्यापासून आखणी करण्यात आली होती. वाहतुकीला अडथळा येऊ न देता, स्पर्धकांना संपूर्ण रस्ता मोकळा राहील, याची दक्षता वाहतूक पोलिसांनी घेतली. अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त प्रसाद अक्कानवरू, सहायक पोलीस आयुक्त सुरेंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चतु:शृंगी वाहतूक विभागाचे सहायक पोलीस निरीक्षक प्रकाश मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या संपूर्ण बंदोबस्ताची जबाबदारी पेलली होती.









वाहतूक आणि अतिक्रमण विभागांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील विविध भागांत बुधवारी कारवाई करण्यात आली.

# वाहतुकीस अडथळा; पथारीवाल्यांना दणका

## ‍। शहरातील १५ वॉर्ड ऑफिसअंतर्गत कारवाईसाठी विशेष मोहीम । वाहतूक तथा अतिक्रमण विभागाची कारवाई

**पुणे : प्रतिनिधी**

शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडीची समस्या भीषण होत आहे. पुणे शहराचा भीषण वाहतूक कोंडीच्या समस्येत जगात ५ वा क्रमांक लागतो. त्या पार्श्वभूमीवर शहरात असणाऱ्या पादचारी मार्गांवरील अतिक्रमणे, अनधिकृत पार्किंग, अवैध प्रवासी वाहतूक, बेशिस्त रिक्षावाले आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी, याबाबत दै. 'पुढारी'तून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. याची दखल घेत बुधवारी शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरणाऱ्या पथारीवाल्यांवर वाहतूक पोलिस विभाग आणि अतिक्रमण विभागाकडून विशेष मोहिमेअंतर्गत शहरातील अनेक ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली.

लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता, शिवाजी रस्ता, डेक्कन, मंडई परिसरासह पर्वती पायथा शिवदर्शन चौक, सहकारनगर व अन्य काही भागात भाजीविक्रेत्यांनी रस्त्यावरच दुकाने थाटली होती. परिणामी, वाहतूक कोंडीची भीषण समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतूक पोलिस विभाग व अतिक्रमण विभाग यांच्या वतीने संयुक्तपणे कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम आयोजिण्यात आली. त्या मोहिमेनुसार बुधवारी शहरातील १५ वॉर्ड ऑफिसअंतर्गत पादचारी मार्गावर अतिक्रमण करणाऱ्या पथारीवाल्यांवर कारवाई करण्यात आली. याबाबतचे आदेश अपर पोलिस आयुक्त संजय शिंदे यांनी शहरातील वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांना दिले आहेत. तर पुणे महानगरपालिकेचे अतिक्रमण विभागप्रमुख माधव जगताप यांनीदेखील कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, त्यानुसार याबाबत कारवाई करण्यात येत आहे.

### पर्वती भागात पथारीवाल्यांवर कारवाई-

शहरातील विविध भागांत वाहतूक पोलिस आणि अतिक्रमण विभागाकडून पादचारी मार्गांवर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार स्वारगेट परिसरातदेखील कारवाई करण्यात आली, तर बुधवारी पर्वती भागातदेखील कारवाई करण्यात आली. दत्तवाडी वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक धुळाजी कोळपे, धनकवडी क्षेत्रीय कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे निरीक्षक धर्मानंद गायकवाड, ओंकार घोलप, रक्षंदा साळुंखे, धनश्री काकडे, किरण शिंदे, श्रीकृष्ण सोनार यांसह अतिक्रमण विभागाचे २१ कर्मचारी, वाहतूक शाखेचे ६ कर्मचारी, स्थानिक पोलिसांचे ३ ट्रक यांच्या ताफ्याने ही कारवाई केली. पर्वती भागातील गजानन महाराज मठ चौक, शिवदर्शन चौक, जनता वसाहत परिसर या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

# कात्रजच्या कोंडीतून दुचाकी 'मुक्त'



## दुचाकींसाठीची स्वतंत्र लेन आता कोंढवा रस्त्यापर्यंत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कात्रज येथील मुख्य चौकातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी दुचाकींसाठी तयार केलेली 'विशेष लेन' आता राजीव गांधी प्राणिसंग्रहालयाच्या चौकातून कोंढव्याकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंत विस्तारण्याचा निर्णय भारती विद्यापीठ वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. त्यामुळे चौकातील दुचाकींना डावीकडे वळण्यास 'फ्री लेन' मिळून गर्दी कमी होण्याची शक्यता आहे. ही लेन सुरू झाल्यास शहरातील दुचाकीसाठींची ही सर्वांत मोठी लेन ठरणार आहे.

कात्रज चौकातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून भारती विद्यापीठ पोलिसांनी महापालिकेच्या माध्यमातून कात्रज चौकात दुचाकीसाठी विशेष लेन राखीव ठेवली आहे. त्यासाठी बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. ही विशेष लेन स्वारगेटकडून येणाऱ्या रस्त्यावर आहे. ही योजना राबवून आता वर्ष पूर्ण झाले आहे. या लेनमुळे चौकातील वाहतुकीला बऱ्यापैकी दिलासा मिळाला होता. मात्र, या लेनमधून जाणाऱ्या दुचाकींना सिग्नलला थांबावेच लागते. सिग्नल लागल्यानंतर या लेनमधील दुचाकीचालक लेनमधून बाहेर पडून दोन चारचाकी वाहनांमधील जागेतून गाडी पुढे नेण्याचा प्रयत्न करतात. त्याने आणखी फटका बसतो. दरम्यान, वर्षभरात वाढलेली वाहनसंख्या आणि मर्यादित रस्ते यामुळे कात्रज चौकातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करत आहे. या कोंडीत अनेकदा बेशिस्त चालकांमुळे आणखी भर पडते. त्यामुळे या कोंडीवर मात करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून आता विविध पातळ्यांवर उपाययोजना करण्यात येत आहेत.

त्याअंतर्गत कात्रज चौकातील दुचाकीसाठीची विशेष लेन राजीव गांधी प्राणिसंग्रहालयापासून कोंढव्याकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंत नेण्याचा विचार भारती वाहतूक पोलिस विभागाकडून केला जात आहे. ही लेन विस्तारल्यास अनेक दुचाकीस्वार सिग्नल असतानाही चौकातून कोंढव्याच्या दिशेला विना अडथळा जाऊ शकतात. त्यामुळे चौकात सिग्नलला थांबणाऱ्या वाहनांची गर्दीही कमी होईल आणि त्या गर्दीचे कोंडीत होणारे रूपांतर टळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### स्वतंत्र लेनचे फायदे

- वेळेची आणि पेट्रोलची बचत
- कोंडी टळल्याने हॉर्न वाजविण्याची गरज नाही
- ध्वनिप्रदूषणात घट शक्य
- दुचाकींचा वेग वाढतो
- बेशिस्त दुचाकीचालकांचा चारचाकींना अडथळा नाही
- सुरक्षित वातावरणनिर्मिती

### अशी असेल 'दुचाकी लेन'

- सध्याचे लेनचे अंतर सुमारे ५० मीटर.
- नवीन लेन राजीव गांधी प्राणिसंग्रहालयापासून करणार
- ती लेन चौकातून कोंढव्याच्या दिशेला काही अंतर पुढे नेणार

### 'दुचाकी लेन' योजना यशस्वी

शहरात कात्रजबरोबरच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील आचार्य आनंदऋषीजी चौकात यापूर्वी दुचाकींसाठी राखीव लेन ठेवण्यात आलेली आहे. विद्यापीठ चौकातील तीन रस्त्यांवर ही लेन आहे. गर्दीच्या वेळेला ही लेन मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरत असल्याचे यापूर्वी दिसून आले आहे.

### 'टू व्हीलर लेन' पॅटर्न देशभरात राबवणार





> दुचाकीसाठीची 'विशेष लेन' विस्तारण्याबाबत महापालिकेच्या पथ विभागाला प्रस्ताव पाठविला आहे. या लेनची लांबी वाढविल्यास दुचाकीचालकांना मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळेल. तसेच, उर्वरित रस्त्यावर चारचाकी वाहनचालकांनी लेनची शिस्त पाळल्यास निश्चितच येथील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईल. या लेनमुळे रस्त्यावरील सुरक्षाही वाढणार आहे.
>
> – विष्णू पवार, वरिष्ठ निरीक्षक, भारती विद्यापीठ वाहतूक विभाग



विद्यापीठ चौकात यापूर्वी केलेल्या दुचाकींच्या लेनचे संग्रहित छायाचित्र.


### मटा भूमिका

महापालिकेचे आयुक्त शेखर गायकवाड यांनी अर्थसंकल्पाच्या आराखड्यात दुचाकींसाठी 'फ्री वे' सुरू करण्याची घोषणा केली होती. शहरातील कोणत्याही रस्त्यावर सर्वाधिक संख्या दुचाकींची असते. एकीकडे सार्वजनिक सेवा वाढविण्याचे प्रयत्न करतानाच दुचाकींची वाहतूक अधिकाधिक सुलभ व सुरळीत करण्यासाठी असे उपाय केलेच पाहिजेत. विद्यापीठाच्या चौकात प्रथम दुचाकींसाठी स्वतंत्र लेनचा प्रयोग यशस्वी झाला. मात्र, शहरात अन्यत्र त्याचा विस्तार करण्यासाठी अधिक वेगाने प्रयत्न होणे गरजेचे आहे. तसेच या प्रयोगांमधील त्रुटींचाही अभ्यास करून त्यामध्ये पुढील काळात सुधारणा करणे शक्य आहे.

# २५ चौकांत थ्रीडी झेब्रा क्रॉसिंग

## महापालिका प्रशासनाचा निर्णय : पोलिसांनी दिला होता प्रस्ताव

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. १३ -** महापालिकेच्या पथविभागाने शहरात प्रायोगिक तत्त्वावर थ्री डी झेब्रा क्रॉसिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. सुरुवातीला २५ चौकांत हे क्रॉसिंग होणार आहेत. महत्त्वाच्या चौकांमध्ये थ्री डी झेब्रा क्रॉसिंग करावेत, अशी शिफारस वाहतूक पोलिसांनी केली आहे. सध्या बीएमसीसी महाविद्यालय चौक, डेक्कन जीमखाना याठिकाणी झेब्रा क्रॉसिंग तयार केले आहेत.

थ्री डी क्रॉसिंगमुळे वाहनचालक वाहनांचा वेग कमी करतील, वाहनचालकांचे यामुळे लक्ष वेधले जाईल आणि वेगाला आळा बसेल. यामुळेच महापालिका प्रशासनाने नोव्हेंबरमध्ये हे क्रॉसिंग तयार केले आहेत.

पथ विभागाच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारच्या क्रॉसिंगमुळे वाहतूक नियंत्रणात येत आहे. त्यामुळेच महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये विविध चौकांमध्ये थ्री डी झेब्रा क्रॉसिंग करण्यासंदर्भात तरतूद केली आहे. यामध्ये लोकमान्य टिळक चौक, स्वारगेट येथील विविध चौक, पुणे स्टेशन, जुना बाजार चौक, वाडीया महाविद्यालय चौक, येरवडा चौक, शास्त्रीनगर चौक यांचा समावेश आहे.

> प्रशासनाने शहरात थ्री डी क्रॉसिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्य चौकामध्ये जास्त वेगाने वाहने चालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळेच वाहतूक पोलिसांकडून यासंदर्भातील माहिती गोळा करण्यात येत आहे. वाहतूक पोलिसांशी चर्चा करून चौक अंतीम करण्यात येत आहे.
>
> **व्ही.जी. कुलकर्णी,** प्रमुख, पथ विभाग

### पहिल्यांदा इंग्लडमध्ये प्रयोग

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जगामध्ये पहिल्यांदा इंग्लडमध्ये थ्री डी झेब्रा क्रॉसिंग करण्यात आले. नागरिकांची सुरक्षितता वाहनचालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे क्रॉसिंग महत्त्वाचे आहेत. वाहनचालकांना कोणत्याही बाजूने हे क्रॉसिंग सहज गतीने दिसतात. दिल्लीमध्ये अशा प्रकारचे क्रॉसिंग २०१६ मध्ये तयार करण्यात आले आहेत.

पुढारी – दि. १० फेब्रुवारी, २०२०

# नो पार्किंगमधील वाहनांवर कारवाई

**वारजे : पुढारी वृत्तसेवा**

गणपती माथा येथे मुख्य रस्त्यालगत वाहतूक नियमांचे उल्लंघन करून नो पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर वारजे वाहतूक विभागाच्या वतीने कारवाई करण्यात आली. यामध्ये खासगी बस, तसेच तीनचाकी व चारचाकी अशा पंधरा वाहनांना जॅमर लावण्यात आले. या वाहन चालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दंडही वसूल करण्यात आला.

गणपती माथा येथे मुख्य रस्त्यालगत नो पार्किंगचे फलक लावण्यात आले आहेत. या ठिकाणी अनेक वाहनचालकांकडून नियमितपणे दिवसभर मोठी वाहने उभी केली जातात.

या ठिकाणी बस स्टँड असून येथील अनाधिकृतपणे पार्किंग केलेल्या मोठ्या वाहनांमुळे पीएमपीच्या बसेस लावण्यासाठी तसेच बस वळविण्यासाठी मोठा अडथळा निर्माण होत असून परिसरात वाहतूककोंडी होण्यास ही वाहने जबाबदार असल्याचे दिसून आले. त्यामुळे अशा प्रकारच्या वाहनांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला असल्याचे वाहतूक पोलिस निरीक्षक स्वाती थोरात यांनी सांगितले. सदरील कारवाई वारजे वाहतूक पोलिस नरेंद्र महांगरे, आबा उत्तेकर, किरण पवार, माणिक कुंभार, योगेश वाघ, वसंत पवार यांनी केली.



'नो पार्किंग'मधील वाहनांवर जॅमर कारवाई करताना वाहतूक पोलिस.

सकाळ – दि. २७ फेब्रुवारी, २०२०

# नियम मोडणाऱ्या अवजड वाहनांवर बडगा

## नगर रस्त्यावर विमानतळ वाहतूक विभागाची कारवाई; एक लाख ४० हजार रुपये दंड वसूल

**वडगाव शेरी, ता. २६ : नगर रस्त्यावर वाहतुकीला अडथळा करून रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या आणि वाहतूक नियम मोडणाऱ्या ४२ अवजड वाहनांवर कारवाई करत यांच्याकडून सुमारे एक लाख ४० हजार रुपये दंड विमानतळ वाहतूक विभागाने वसूल केला. या महिन्यात आतापर्यंत एकूण ७० अवजड वाहनांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी यांनी दिली.**

नगर रस्त्यावर अनेक ठिकाणी बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. या बांधकाम प्रकल्पांना साहित्य पुरवणाऱ्या अवजड वाहनांकडून अनेकदा नियमांचे उल्लंघन होत असलेल्या तक्रारी वाहतूक विभागाकडे आल्या होत्या. त्यामुळे विमानतळ वाहतूक विभागाने अवजड वाहन विरोधात विशेष मोहीम राबवून कारवाई केली.

'नो एंट्री'तून वाहन चालवणे, रस्त्यावर अडथळा होईल, अशा प्रकारे वाहन उभे करणे, 'नो पार्किंग'मध्ये वाहन उभे करणे, यासारख्या वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाई करण्यात आली.

नगर रस्त्यावर लोहगाव भागातून येणारी अवजड वाहने दर्गा येथून एकेरी वाहतूक असलेल्या रस्त्यावरून विरुद्ध दिशेने येतात, तसेच बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी अवजड वाहने रस्त्यावर थांबतात. काही अवजड वाहनांचे चालक वेग नियंत्रण नियमाचे उल्लंघन करतात. त्यामुळे अपघात होतात. अनेक अवजड वाहनांना नंबर प्लेट नसणे, मागील दिवा नसणे असे प्रकार निदर्शनास येतात. त्यामुळे विमानतळ वाहतूक विभागाने नगर रस्ता परिसरात खराडी बायपास चौक, विमाननगर भागात विशेष मोहीम राबवून कारवाई केली.



**नगर रस्ता : नियम मोडणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाई करताना विमानतळ वाहतूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी.**

> **“ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अवजड वाहनांवर यापुढेही कारवाई सुरूच राहणार आहे. अवजड वाहनांसह सर्वच वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे.**
> **- जितेंद्र कोळी,**
> पोलिस निरीक्षक, विमानतळ वाहतूक विभाग

# बेशिस्त चालकांची यादी जाहीर

## दंडवसुलीसाठी पोलिसांची शक्कल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बेशिस्तपणे आणि वाहतुकीच्या नियमाचा भंग करून वाहन चालविणाऱ्या शंभर वाहनचालकांची यादी पुणे वाहतूक पोलिसांनी प्रसिद्ध केली आहे. यादीत 'सीसीटीव्ही' आणि 'ई-चलन डिव्हाइस'च्या माध्यमातून केलेल्या कारवाईचा समावेश असून, त्यामध्ये सर्वाधिक १०८ केस दाखल असल्याचे समोर आले आहे.

शहरातील वाहतूक सुरक्षित आणि सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमित प्रयत्न करण्यात येत आहेत. वाहन चालकांकडून करण्यात येणाऱ्या नियमभंगांमुळेच अनेक अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वाहन चालकांना शिस्त लागून अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यासाठी वाहतूक शाखेतर्फे 'ई-चलन' मशिनद्वारे आणि 'सीसीटीव्ही'द्वारे कारवाई करण्यात येते. या कारवाईची माहिती संबंधितांना 'एसएमएस'द्वारे पाठविली जाते. त्यांनी तो दंड ऑनलाइन भरणे अपेक्षित असते; परंतु बऱ्याचदा वाहन चालकांचा कल दंड न भरण्याकडे असतो. अशा प्रकारे दंड प्रलंबित असलेल्या वाहनचालकांची संख्या अधिक आहे. हा दंड वसूल करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सर्वाधिक केसचा दंड प्रलंबित असलेल्या शंभर जणांची यादी प्रसिद्ध केली आहे.



| १०८ | ₹ ७० हजार | ₹ ४३०० |
|---|---|---|
| सर्वाधिक दाखल केस | सर्वाधिक दंड | सर्वांत कमी दंड |

### कारवाई अमान्य; येथे मागा दाद

'ई-चलन' मशिन किंवा 'सीसीटीव्ही'द्वारे केलेली कारवाई मान्य नसलेले वाहनचालक न्यायालयात किंवा वाहतूक पोलिस शाखेच्या मल्टिमीडिया सेलच्या पोलिस निरीक्षकांकडे दाद मागू शकतात.

### येथे तपासा ऑनलाइन दंड

वाहतूक पोलिसांनी केलेला दंड तपासण्यासाठी https://mahatrafficechallan.gov.in या वेबसाइटवर किंवा mahatrafficapp या मोबाइल ॲपवर माहिती तपासता येणार आहे. ही माहिती तपासण्यासाठी वाहनाचा नोंदणी क्रमांक आणि इंजिन क्रमांक किंवा चॅसिस क्रमांकाचे शेवटचे चार आकडे देणे आवश्यक आहे.

### पोलिसांकडून पीएमपीला लक्ष्य : पीएमपी अधिकाऱ्यांचा आरोप

# कात्रज बसस्थानकाबाहेरील तीन बसला लावला जॅमर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कात्रज येथील पुणे महानगर परिवहन महामंडळा (पीएमपी) च्या मुख्य बसस्थानकाबाहेर उभ्या असलेल्या बसवर वाहतूक पोलिसांकडून सातत्याने कारवाई केली जात आहे. रविवारी (दि. १६) सकाळी तीन बसला जॅमर लावत पोलिसांनी पुन्हा 'पीएमपी'ला लक्ष्य केले; तसेच मुख्य रस्त्यापासून बस स्थानकालगत उभ्या केल्या जात असतानाही पोलिसांकडून कारवाई होत असल्याचा आरोप पीएमपी अधिकाऱ्यांनी केला आहे.

कात्रज बसस्थानक मुख्य चौकालगतच आहे. या चौकात सातत्याने वाहतूककोंडी होत असते. त्यातच स्थानकाबाहेर बस उभ्या राहत असल्याने वाहतूककोंडीत भर पडत असल्याने वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जाते. कोंडी झाल्याने अनेक वाहने बसस्थानकात घुसत असल्याने पीएमपी प्रशासनाने स्थानकासमोर बॅरिकेड्स लावले होते. त्यामुळे स्थानक आवारात येणाऱ्या वाहनांना अटकाव झाला होता. प्रवाशांनाही दिलासा मिळाला होता; पण काही दिवसांपूर्वी वाहतूक पोलिसांनी काहीही सूचना न देता ही बॅरिकेड्स उचलून नेली. त्यामुळे पुन्हा वाहनांची घुसघोरी सुरु झाली आहे. मुख्य रस्त्याच्या कडेला पिवळा पट्टा मारला आहे. या पट्ट्यापासून ८ ते १० फूट अंतरावर बस उभ्या असतात. तरीही बसला जॅमरची कारवाई केली जाते, असे पीएमपी अधिकाऱ्यांनी सांगितले.

रविवारी तीन बस स्थानकांबाहेर उभ्या असताना पुन्हा त्यांना जॅमर लावले. एका बसमध्ये प्रवासी बसलेले असतानाही चालकाला खाली उतरवून जॅमर लावले. बस नो-पार्किंगमध्ये असल्याचे सांगत पोलिसांकडून प्रत्येकी पाच हजार रुपये दंड भरण्यास सांगितले. पण काही वेळाने पोलिसांनीच पुन्हा जॅमर काढले. यापूर्वीही पिवळ्या पट्टीपासून लांब आत उभ्या असलेल्या बसला जॅमर लावण्याचे प्रकार घडल्याचे कात्रज बसस्थानकातील कर्मचाऱ्यांनी सांगितले.

### पोलिसांनी बससेवेला सहकार्य करणे अपेक्षित

“ कात्रज बसस्थानकात बस उभ्या करण्यासाठी पुरेशी जागा नाही. त्यामुळे समोरील जागेत बस उभ्या केल्या जातात; पण मुख्य रस्त्यापासून या बस खूप आतमध्ये उभ्या असतात. तरीही पोलिसांकडून कारवाई केली जाते. बॅरिकेड्स हटविल्यानंतर याबाबत पोलीस आयुक्तांकडे लेखी तक्रार केली आहे. पण, त्यानंतर पीएमपीवर कारवाई सुरुच आहे. पोलिसांनी बससेवेला सहकार्य करणे अपेक्षित आहे.

**- अनंत वाघमारे,**
**वाहतूक व्यवस्थापक, पीएमपी**



महाराष्ट्र टाइम्स – दि. १२ फेब्रुवारी, २०२०

# डीपी रोडवरील वाहनांवर कारवाई

## वाहतूक शाखेकडून रस्त्यालगत 'नो पार्किंग'चे फलक

**म. टा. प्रतिनिधी, धायरी**

म्हात्रे पूल ते राजाराम पूल येथील शंभर फुटी डीपी रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्क केल्यामुळे वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून या रस्त्यावरील वाहनांवर कारवाईस सुरुवात झाली आहे. वाहनधारकांच्या माहितीसाठी 'नो पार्किंग'चे फलकदेखील जागोजागी लावण्यात आले आहेत.

सिंहगड रोड आणि कर्वेनगर या परिसरातील नागरिकांसाठी म्हात्रे पूल ते राजाराम पूलदरम्यान असलेल्या डीपी रोडच्या दुतर्फा मंगल कार्यालये, लॉन्स आणि हॉटेल्स आहेत. लग्न, विविध महोत्सवांच्या काळात या ठिकाणी दुचाकी आणि चारचाकी वाहने रस्त्यावरच पार्क केल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत होती. यावर पुणे वाहतूक शाखेचे अतिरिक्त आयुक्त संजय शिंदे यांनी ठोस पावले उचलून, परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्याचा निर्णय घेऊन, त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.




वाहनधारकांच्या माहितीसाठी रस्त्यालगत लावण्यात आलेले 'नो पार्किंग'चे फलक.

### कारवाईच्या धास्तीने शोधला पर्याय

डीपी रस्त्यालगत असणाऱ्या मंगल कार्यालये, लॉन्स आणि हॉटेल्स यांनी त्यांच्या ग्राहकांसाठी पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास संबंधित व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आदेश वाहतूक शाखेकडून देण्यात आले होते. त्यामुळे व्यावसायिकांकडून त्यांच्या ग्राहकांसाठी पर्यायी पार्किंगची व्यवस्था करण्यात येत असल्याचे पाहायला मिळत आहे.




शरणू जवळगी

शंभर फुटी डीपी रस्त्यावरील वाहनांवर कारवाई करताना वाहतूक शाखेचे कर्मचारी.

पुढारी – दि. १९ फेब्रुवारी, २०२०

# हांडेवाडी चौकात कोंडीपासून दिलासा

## वाहतूक पोलिसांची नेमणूक

**फुरसुंगी : पुढारी वृत्तसेवा**

हांडेवाडी चौकात वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे त्रस्त झालेल्या रहिवाशांना दिलासा मिळाला असून याठिकाणी वाहतूक शाखेमार्फत दोन वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्यात आली आहे.

काही वर्षांपूर्वी पुणे शहरातील अवजड वाहतूक मंतरवाडी कात्रज बाह्यवळण मार्गाद्वारे वळविण्यात आली होती. तेव्हापासून या मार्गावर अवजड वाहतूक प्रचंड प्रमाणात वाढली. त्यातच गेल्या काही वर्षांत या भागात झालेले नागरिकीकरण, वाढलेले व्यवसाय, फर्निचर व स्टील दुकाने, शाळा, मंगल कार्यालये, परिसरातील असलेल्या खाणी, पाणी व्यवसाय यांमुळे मोठ्या प्रमाणात रहदारी वाढली आहे.

त्यामुळे या मार्गावर अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच या मार्गाचे रखडलेले रुंदीकरण, अवैध प्रवासी वाहतूक, बेशिस्त रिक्षाचालक, रस्त्याकडेला उभे राहणारे मालट्रक, रस्त्यालगतच असणारे वजन काटे, चौकाचौकात व्यावसायिक, हातगाडीधारक, फिरस्ते यांनी केलेले अतिक्रमण, लग्नाच्या दिवशी मंगल कार्यालयांसमोर रस्त्यालगतच लावण्यात येणारी वाहने, नियम न पाळणारे वाहनचालक, रस्त्याची दुरवस्था यामुळे हा मार्ग विशेषकरून हांडेवाडी चौकात वारंवार वाहतूककोंडी होऊन प्रवासी, रहिवासी, शालेय विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप होत आहे.




वाहतूक पोलिसांची नेमणूक झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यात आले.

यासाठी हांडेवाडी चौकात वाहतूक सिग्नल बसविण्यात यावा व वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात आली होती. यासंदर्भात आमदार संजय जगताप यांनी पोलिस आयुक्तांशी पत्रव्यवहार करून याठिकाणी दोन वाहतूक पोलिस नेमण्यात आले आहेत. याप्रसंगी औताडे हांडेवाडीचे माजी सरपंच संजय जाधव, विकास हांडे, दिनेश बहीरट आदी उपस्थित होते.

# बेशिस्त चालकांवर हडपसर पोलिसांकडून कारवाई



हडपसर : लोहिया उद्यानासमोर नो-एंट्रीतून आलेल्या वाहनचालकांवर कारवाई करताना पोलिस अधिकारी.

हडपसर, ता. ९ : परिसरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर हडपसर वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई सुरू केली असून, बेशिस्त वाहनचालकांवर शिस्तीचा बडगा उगारला जात आहे.

विनापरवाना गाडी चालवणे, गाडीचे कागदपत्रे नसणे, अवजड वाहतूक, अल्पवयीन मुलास गाडी चालवण्यात देणे, मद्यपान करून वाहन चालविणे, हेल्मेट परिधान न करणे, नो-एंट्रीतून वाहन चालवणे, कर्कश हॉर्न वाजविणे अशा बेशिस्त वाहनचालकांनी आता या कारवाईची धास्ती घेतली आहे. वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे, वाहनांवर फॅन्सी नंबर प्लेट लावणे अशा वाहन चालकांवरदेखील कारवाई केली जात आहे. हडपसर वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक ज्ञानदेव म्हेत्रे म्हणाले, "वाहतुकीला शिस्त लागावी व अपघाताचे प्रमाण कमी व्हावे, या दृष्टीने पोलिस निरीक्षक राजेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई सर्व प्रमुख रस्त्यावर केली जात आहे."